**नियमीत दिवाणी दावा क्र. १०/२०१८**

## निशाणी ४६ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने यापूर्वी त्यांचे विरुद्ध दाखल केलेल्या रे.मु.नं. ६६/२०१४ मधील कागदपत्रांच्या नक्कला वेळेत उपलब्ध न झाल्याने वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्यांचे विरुद्ध विना कैफियत चौकशीचा आदेश झालेला आहे. प्रस्तुतकामी त्यांची कैफियत स्विकारुन गुणान्वये दाव्याचा निर्णय होणे त्यांच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास, त्यांच्यावर अन्याय होवून त्यांचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमीत नुकसान होवून त्यांना पुरावा देण्यापासून वंचीत रहावे लागणार आहे व शेवटी त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादीने त्यांचे म्हणणे अर्जाचे मलपृष्ठावर दाखल केले व अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादींनी यापूर्वी निशाणी ३३ कडे अशाच स्वरुपाचा अर्ज दिला होता. तो रद्द झालेला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा कैफियत स्विकारणेबाबत अर्ज करता येणार नाही. दिलेले कारण खोटे आहे. किती विलंब झाला त्याचा उल्लेख नाही. शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. अर्ज वाचला, त्यावरील वादीचे म्हणणे पाहीले. अभिलेख पाहिला.

उभय पक्षकारांच्या विधिज्ञांना ऐकले. प्रतिवादींना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांची कैफियत दाखल न केल्याने त्यांचे विरुद्ध विना कैफियतीचा आदेश करण्यात आला. तत्पूर्वी, प्रतिवादींनी दाखल केलेले अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर देखील त्यांनी निशाणी ३१ कडे मुदत अर्ज दाखल केला होता. तथापि, मुदत संपल्याने तो नामंजूर करुन, प्रतिवादीं विरुद्ध विना कैफियतीचा आदेश करण्यात आलेला आहे. अभिलेखावरुन प्रतिवादींना पुरेशी संधी दिल्याचे दिसते. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. तथापि, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी, प्रतिवादींचे गुंतलेले हितसंबंध विचारात घेता, नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादींना संधी देणे गरजेचे वाटते. तथापि, प्रतिवादींनी स्पष्ट न केलेला विलंब विचारात घेता, त्यांच्यावर काही दंडात्मक शास्ती करुन तशी संधी त्यांना दिल्यास ते न्यायोचीत होईल. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज निशाणी ४६ हा विनंतीनुसार प्रतिवादींनी वादीस रक्कम रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त) कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी सदरची कॉस्ट ही पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी वादीस अदा न केल्यास अथवा न्यायालयात जमा न केल्यास, प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

माळशिरस. (**र. सु. क्षीरसागर**)

दिनांक १५/०२/२०२१. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.

## ***C E R T I F I C A T E***

*I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.*

| | | | |
|---|---|---|---|
| *(a)* | *Name of the Stenographer* | *:* | ***Nagesh N. Konda, Grade-II.*** |
| *(b)* | *Court* | *:* | ***Civil Court Senior Division, Malshiras.*** |
| *(c)* | *Judgment signed by P.O. on* | *:* | ***15.02.2021.*** |
| *(d)* | *Judgment uploaded on* | *:* | ***15.02.2021.*** |